शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई
सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
फोन नं. ०२२-२२६२०६६८, ६९, ७० फॅक्सः ०२२-२२६२०७८९ संकेत स्थळ: www.gdcmumbai.org

**तातडीचे/महत्वाचे** क्रं.शादंमवरुमुं/आस्था/राप/चि.सहा./मुलाखत/१८८७     दिनांक: १७/०३/२०२०

विषय :- दिनांक १/०४/२०२० ते ३०/०९/२०२० या कालावधीच्या सत्रासाठी चिकित्सालयीन सहाय्यकाची पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्याबाबत शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई - ४०० ००१.

संदर्भ :- क्रं.शादंमवरुमुं/आस्था/राप/१६४३,दिनांक :- २९/०२/२०२०

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय जाहिरातीनुसार शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई यासंस्थेतील चिकीत्सालयीन सहाय्यक यासंवर्गातील एकूण २५ विद्यावेतनी पदे दिनांक १/०४/२०२० ते ३०/०९/२०२० यासहा महिन्याच्या सत्राकरीता भरण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने सदर पात्र उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २६/०३/२०२० गुरुवार रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर पदाकरीता मुंबई, उपनगरे व महाराष्ट्राच्या इतर शहरातून मोठया प्रमाणावर उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

सद्स्थितीत मुंबई, उपनगरे तसेच महाराष्ट्राच्या इतर भागात कोरोना या आजाराचे संक्रमण मोठया प्रमाणावर सुरु असल्याने महाराष्ट्र शासनाने शाळा, महाविद्यालये तसेच इतर शासकीय कार्यक्रम दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत स्थगित केले आहेत.

यास्तव वरील पार्श्वभूमीवर चिकीत्सालयीन सहाय्यक पदाकरीता दिनांक २६/०३/२०२० गुरुवार रोजी आयोजित करण्यात आलेली **मुलाखत पुढील आदेशा पर्यंत तूर्त स्थगित करण्यात येत आहेत.** संबंधितानी याची नोंद घ्यावी. तसेच सदर पदाच्या मुलाखतीचा नविन दिनांक कळविण्यात येईल.

अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,मुंबई.

प्रति,

सुचना फलक / संकेतस्थळ
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
मुंबई.

प्रत :- मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with CamScanner